**पंतप्रधान नरेंद्र मोदींची इराणच्या राष्ट्राध्यक्षांसोबत चर्चा**

12 मार्च 2026

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आज इराणचे राष्ट्राध्यक्ष डॉ. मसूद पेझेशकियन यांच्याशी दूरध्वनीद्वारे संवाद साधला.

2. इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेशकियन यांनी पंतप्रधानांना इराणमधील सध्याच्या परिस्थितीबाबत अवगत केले आणि प्रदेशातील अलीकडील घडामोडींविषयी आपली मते मांडली.

3. पंतप्रधानांनी प्रदेशातील सातत्याने बदलत्या सुरक्षा परिस्थितीबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आणि सर्व प्रश्नांवर संवाद व राजनयिक माध्यमातूनच तोडगा काढावा या भारताच्या सातत्यपूर्ण भूमिकेचा पुनरुच्चार केला.

4. पंतप्रधानांनी इराण सहित प्रदेशातील भारतीय नागरिकांच्या सुरक्षितता आणि कल्याणाला भारताची सर्वोच्च प्राधान्य असल्याचे अधोरेखित केले. तसेच ऊर्जा आणि वस्तूंच्या विना-अडथळा वाहतुकीचे महत्त्वही स्पष्ट केले.

5. उभय नेत्यांनी परस्परांच्या संपर्कात राहण्यावर सहमती दर्शवली.

**नवी दिल्ली**

**12 मार्च 2026**